सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.३५/२०२६/३१ दिनांक: २२ जुलै, २०२६

**-:शुध्दिपत्रक:-**

**विषय :- सन २०२७ पासून राज्य सेवा मुख्य परीक्षेमधील वैकल्पिक विषय वगळण्याबाबत व मुलाखतीचे गुण सुधारीत करण्याबाबत**

**संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २५ जून, २०२६ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २५ जून, २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२७ पासून मुख्य परीक्षेतील वैकल्पिक विषयाचे दोन्ही पेपर्स वगळण्यात आले आहेत. त्यानुसार, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२७ पासून भाषा विषयांचे दोन अर्हताकारी पेपर (मराठी व इंग्रजी), निबंधाचा एक पेपर आणि सामान्य अध्ययनाचे चार पेपर असे एकूण सात अनिवार्य पेपर असतील. यापैकी भाषा विषयांचे दोन्ही पेपर हे २५% गुणांसह केवळ अर्हताकारी (Qualifying) स्वरूपाचे आहेत. त्यामुळे राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या निकालासाठी निबंधाचा एक पेपर व सामान्य अध्ययनाचे चार पेपर अशा एकूण पाच पेपर्सचे १२५० गुण विचारात घेतले जातील.

**२.**. सुधारित परीक्षा पद्धतीनुसार राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२७ पासुन वैकल्पिक विषय वगळण्यात आल्यामुळे लेखी परीक्षेचे गुण १२५० इतके झाले आहेत. लेखी परीक्षा व मुलाखतीच्या गुणांचे गुणोत्तर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानूसार संतुलित ठेवण्याच्या दृष्टीने **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२७ व त्यापुढील राज्यसेवा (मुख्य) परीक्षांसाठी मुलाखतीचे गुण १७५ निश्चित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.** सदर निर्णयानुसार राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२७ ची सुधारित परीक्षा योजना स्वतंत्रपणे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण : नवी मुंबई

सरिता बांदेकर-देशमुख,
परीक्षा नियंत्रक व सह सचिव,
गोपनीय आणि धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग